**सं. फौ. ख. क्र.५७५/२०२३**

सरकार वि. इम्रान कुरेशी

**नि.क्र.१९**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.४ यांची जबानी</u>**

मी शपथेवर कथन करतो की,

**<u>माझे नाव– उत्तम धर्मा खाडे ,</u>**

वय– ४६ वर्षे, व्यवसाय–पो.हवा./२३४, बारामती शहर पो.स्टे.,

रा.बारामती, ता.बारामती, जि.पुणे.

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एन. पी. कुचेकर, यांचेमार्फत शपथेवर सुरु –</u>**

दि.११/०९/२०२२ रोजी मी वालचंदनगर पोलीस स्टेशन येथे पो.हवा. या पदावर कार्यरत होतो. त्या दिवशी पो.हवा.बेलदार यांनी खबर दिली की, इम्रान कुरेशी रा.लासुर्णे याने त्याच्या घरासमोर गायीची वासरे व गायी बांधलेल्या आहेत. त्यांनी घटनास्थळावर जावून पाहणी केली तेव्हा त्याला दोन गायी टेम्पोमध्ये होत्या व चौदा वासरे बांधलेली दिसली. त्यानंतर ते जनावरे घेवून पोलीस स्टेशनला आले व त्यांनी फिर्याद दिली. ठाणे अंमलदार यांनी गुन्हा नोंद करून तपास माझेकडे दिला. तपासादरम्यान मी घटनास्थळ पंचनामा केला. छोटा हत्ती जप्त केले. आता मला जप्ती पंचनामा दाखविला. त्यावर माझी व पंचांच्या सहया आहेत. त्यातील मजकूर बरोबर आहे. **<u>जप्ती पंचनाम्यास नि.क्र.२०</u>** देण्यात येते. वाहनाची पावती फाडून जमा केली. **<u>पावतीस नि.क्र.२१</u>** देण्यात येते. वासरे गो शाळेत जमा केली. सदर **<u>पत्रास नि.क्र.२२</u>** देण्यात येते. घटनास्थळ पंचनामा केला. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविला. त्यावर माझी व पंचांच्या सहया आहेत. त्यातील मजकूर बरोबर आहे. **<u>घटनास्थळ पंचनाम्यास नि.क्र.२३</u>** देण्यात येते. जनावरे यांच्या **<u>ताबा पावतीस नि.क्र.२४</u>** देण्यात येते. साक्षीदारांची तपास टिपणे नोंदविली. आरोपीला अटक करून न्यायालयात हजर केले. आरोपीविरुध्द पुरावा मिळून आल्याने आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे श्री.लोंढे, विधीज्ञ यांचेमार्फत –</u>**

२. मी चार वर्षापासून वालचंदनगर पोलीस स्टेशन येथे कार्यरत होतो. मी लासुर्णे बीटमध्ये कामाला होतो. मला लासुर्णे येथील भौगोलिक अभ्यास होता. लासुर्णे येथील लोक शेतीपूरक गुरांचा व्यवसाय करतात का कसे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझेकडे चार वर्षांत एकच केस तपासासाठी आली. घटनास्थळ कोणत्या वॉर्डामध्ये येते हे मला सांगता येणार नाही. घटनास्थळ कोणाच्या नावाने आहे याची माहिती घेतली नाही. त्याचा उतारा हस्तगत केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी व मी घटनेदिवशी एकत्र होतो. रोहिदास चव्हाण यांना मी ओळखत नाही. रोहिदास चव्हाण यांचा जबाब नोंदविला नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा पोलीस स्टेशनमध्ये बसून केला. घटनास्थळाचा नकाशा काढलेला नाही. नकाशा का काढला नाही याचे कारण सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही जमा केलेली जनावरे व फिर्यादीमधील जनावरे वेगवेगळी आहेत. पावतीवर गो शाळेचा शिक्का नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.२४ वरील ताबा पावती पोलीस स्टेशनला बसून तयार केली. पोलीस स्टेशनला आणताना जनावरे जखमी झाली का कसे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीकडे जनावरे जखमी आहेत का कसे याची चौकशी केली नाही. फिर्यादीने मला किती जनावरे जखमी आहेत याचा नेमका आकडा मला सांगता येणार नाही. जनावरांची तपासणी वैद्यकीय अधिका–यामार्फत केली नाही. जनावरे गो शाळेत जमा करेपर्यंत सहा तास वेळ गेला. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या ठिकाणी अंधार होता. बारामती येथे जनावरांचा बाजार कधी असतो हे मला सांगता येणार नाही. लासुर्णे शेळगाव मार्गे बरीच वाहने जनावरे घेवून बाजारला जातात का कसे मला सांगता येणार नाही. पोलीस स्टेशन शेजारी म्हशींचा गोठा आहे का मला सांगता येणार नाही. पोलीस स्टेशनच्या बाजूला शेती महामंडळाचे क्षेत्र आहे. तेथे जनावरे चरण्यासाठी येतात का कसे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोटा पूर्ण करण्यासाठी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-

**( ए. बी. पाटील)**

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

**दि.१७/०४/२०२६**

इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे.